स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ,नांदेड.

अंतर्गत

समाजकार्य विदयाशाखेतील पीएच.डी पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

संशोधन विषय

राज्यशासकीय निवृत्तीवेतनधारकाच्या (Pensioner) मृत्यु पश्चात त्याच्या कुटुंबास येणा-या सामाजीक व आर्थिक समस्यांचा अभ्यास विशेष संदर्भ - नांदेड जिल्हा

संशोधक

वामन रामराव काकडे

M.Com(SET),MSW(SET,NET)

उपकोषागार अधिकारी,पेठ उमरी,नांदेड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.ए.पी.वलेकर.

सहयोगी अधिव्याख्याता व संशोधन मार्गदर्शक,

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविदयालय,सिडको,नांदेड.

मार्च-२०१८

राज्यशासकीय निवृत्तीवेतनधारकाच्या (Pensioner)मृत्यु पश्चात त्याच्या कुटुंबास येणा-या सामाजीक व आर्थिक समस्यांचा अभ्यास विशेष संदर्भ - नांदेड जिल्हा.

१.प्रस्तावना :

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला देश आहे. भारतात विविध धर्मांचे, वंशाचे व पंताचे लोक एकत्र नांदत असतात. त्यामुळे प्रत्येक धर्माची व वंशाची संस्कृती आढळुन येते. भारतीय समाज रचनेत प्रामुख्याने ग्रामीण, शहरी व आदिवासी समुदाय आढळतात. त्यात महिला, बालक, युवक व वृध्द यांचा समावेश असतो.

पुर्वी भारतीय समाजात एकसंधता होती, एकत्र कुटूंब पध्दत असल्याने एकत्र कुटूंबात एकमेकाला भावनिक आधार आपोआपच मिळत असे. स्त्रिया अर्थाजन करीत नव्हत्या त्यामुळे जेष्ठांचे संगोपन व एकंदरीत सर्व संसार व्यवस्थीत चालत असे.थोडक्यात जेष्ठांना पुर्वी कुटूंबात व समाजात मान व प्रतिष्ठा होती.

परंतु एकोणिसाव्या शतकात जग झपाटयाने बदलायला लागले.पाश्चात्य विचारांचे वारे आपल्या कडे ही वाहू लागले आणि आपली कुटुंब व्यवस्था विघटीत होऊ लागली.आज वयोवृध्दांच्या संदर्भात नोकरीच्या निमीत्ताने होणारे स्थलांतर वाढत्या आर्युमानामुळे वाढती जेष्ठांची संख्या, जेमतेम उत्पन्न,अशा अनेक बहुविध कारणांच्या प्रभावाने समस्येत वाढ झालेली आहे. तसेच ज्येष्ठांकडे पाहण्याचा दृष्टीकोनही बदला आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात सुमारे १०.४ कोटी वृध्द आहेत.यात ५.३ कोटी पुरूष तर ५.१ कोटी महिला आहेत.महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येत वृध्दांचे प्रमाण ९.९ % एकुण वृध्दांची संख्या सुमारे १ कोटी ११ लाख ७ हजार असुन त्यात पुरूषांची संख्या ५२ लाख ५४ हजार व महीलांची संख्या ५८ लाख ५३ हजार ऐवढी आहे.

१८५७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्य चळवळीनंतर ब्रिटीशांनी भारतातील पेन्शन प्रणाली सुरू केली.हे ब्रिटनमध्ये प्रचलित असलेल्या पेन्शन योजनेचे हे प्रतिबिंब होते.परंतु या प्रणालीच्या तरतुदीमुळे कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी वित्तीय आराखडा तयार करण्यास मनाई करण्यात आली.म्हणुनच या सर्व समस्यांशी सामोरे जाणा-या भारतीय पेन्शन कायदा १८७१ मध्ये

पेन्शन सिस्टम ऑफ १८५७ ची जागा घेण्यात आली.सन १८८१ मध्ये रॉयल कमिशन ऑन सिव्हिल इस्टॅब्लिशिजमेंटने सरकारी कर्मचा-यांना पेंशनचा लाभ दिला.निवृत्तीवेतन विषयक सर्व लाभांनकरीता व त्याचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ सध्या महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात आहे.

वय वर्षे ५८ व ६० हे सेवा निवृत्तीचे वय मानन्यात येते.शासकीय सेवक सेवेतुन सेवानिवृत्त झाल्या नंतर त्याला स्वताला किंवा मृत्यु पावल्यास त्याच्या कुटुंबास निवृत्तीवेतन विषयक लाभ व दरमहा मासिक निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन देय ठरते.

भारतात खालील प्रमाणे शासकीय,खाजगी,सार्वजनिक इत्यादी क्षेत्रात निवृत्तीवेतनाच्या वेगवेगळया योजना अस्तीत्वात आहेत.

Figure 1: PENSION SCHEMES IN INDIA



२.कार्यात्मक व्याख्या :

निवृत्तीवेतन :

शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्या नंतर त्यास एकरकमी आणि मासीक पध्दतीने जी रक्कम दिली जाते त्यास निवृत्तीवेतन असे म्हणतात.

निवृत्तीवेतनधारक :

सेवानिवृत्ती मुळे कर्मचा-यास निवृत्तीवेतन देय होत असते असे निवृत्तीवेतन मिळणा-या व्यक्तीस निवृत्तीवेतनधारक असे म्हणतात.

कुटुंब निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतनधारक :

शासकीय सेवेत असताना किंवा सेवानिवृत्त झाल्या नंतर कर्मचा-याचा मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना जे निवृत्तीवेतन दिले जाते त्यास कुटुंबनिवृत्तीवेतन व ते दर महा प्राप्त करणा-यास कुटुंबनिवृत्तीवेतनधारक असे म्हणतात.

राज्यशासकीय निवृत्तीवेतन :

महाराष्ट्रराज्य (राज्यशासन) तर्फे प्रदान करण्यात येणारे निवृत्तीवेतन होय.

निवृत्तीवेतनाचे प्रकार :

निवृत्तीवेतनाचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ सध्या अस्तीत्वात आहे.त्या अन्वये निवृत्तीवेतनाचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

१.नियत वयमान सेवानिवृत्तीवेतन.

२.पुर्ण सेवानिवृत्तीवेतन.

३.रूग्णता निवृत्तीवेतन.

४.भरपाई निवृत्तीवेतन.

५. जखम/दुखापत निवृत्तीवेतन.

६.अनुकंपा निवृत्तीवेतन.

७.असाधारण निवृत्तीवेतन.

८.कुटुंब निवृत्तीवेतन.

३.विषयाची निवड :

प्रगतीशिल महाराष्ट्रात अर्थव्यवस्थेला चालना मिळाल्यामुळे खाजगी,सार्वजनीक,शासकीय अश्या अनेक क्षेत्रात नवनविन रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.त्यामुळे साहजिकच नोकरी करणा-यांचे प्रमाण हि दिवसेनदिवस वाढत राहिले.परंतु अर्थव्यवस्थेचा विकास होत असतांना कामगार,मजुर,नोकरदार,निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांच्या समस्याही वाढल्या.

सेवानिवृत्ती नंतर चे आयुष्य म्हणजे अनेक आर्थिक,सामाजिक,मानसिक,कौटुंबिक इत्यादी अडचनिंना सतत तोंड दयावे लागते.निवृत्तीवेतनधारक सेवा निवृत्त झाला म्हणजे साहजिकच त्याचे वय ५८ व ६० असावे.त्या वयात त्याला निवृत्त झाल्या मुळे मिळणारा दर महाचा पगार निम्मा झ

ालेला असतो तसेच मुलामुलींचा वाढता शिक्षणाचा खर्च वा लग्नासाठी येणा-या आर्थिक अडचणी तसेच वाढत्त्या वया बरोबर भेडसावनारे आजार अश्या ब-याच समस्यांना सामोरे जावे लागते.

अश्या परिस्थितीत जर निवृत्तीवेतन धारकाचा मृत्यु झाला तर त्याच्या कुटुंबावर अनंत अडचनिंचा डोंगरच कोसळतो व या तुन सावरण्यासाठी त्यांना फक्त एकच आधार असतो तो म्हणजे त्यांना मिळणारे कुटुंबनिवृत्तीवेतन होय.आपण ब-याच वेळा बॅक,शासकीय कार्यालय येथे थकलेले रांगेत उभे असणारे व १ तारखेची वाट बघनारे निवृत्तीवेतनधारक पाहतो कारण की १ तारखेला निवृत्तीवेतन त्यांच्या बॅक खात्यात जमा होते व त्यावरच त्यांच्या पुर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबुन असतो.

सदय स्थितीत नांदेड जिल्या अंतर्गत राज्यशासकीय निवृत्तीवेतनधारक यांना नांदेड शहर व १५ तालुक्या अतर्गत असणा-या एकुण ११ बॅकांच्या ६२ शाखेमार्फत निवृत्तीवेतन प्रदान केले जाते.त्यांची दि ०१/०१/२०१८ ची सदय स्थिती खालील तक्यात दर्शवण्यात आली आहे.

अनु.क्र	**प्रकार**	**संख्या**	**टक्केवारी**
१.	निवृत्तीवेतनधारक	१२३२०	६८%
२.	कुटुंब निवृत्तीवेतनधारक	५८२७	३२%
एकुण		१८१४७	१००%

निवृत्तीवेतन धारकाचा मृत्यु पश्चात त्याच्या कुटुंबास निवृत्तीवेतन विषयक काहिच ज्ञान नसते व बॅक तथा शासकीय कार्यालयाचा कसल्याही प्रकारचा अनुभव पण नसतो अश्या परिस्थीतीत त्याना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.निवृत्तीवेतन धारक हयात असल्यास त्यांना येणा-या अडचणी व त्यांच्या मृत्यु नंतर त्यांच्या कुटुंबास येणा-या अडचणी हया वेगवेगळया असतात .कुटुंबास येणा-या अडचणींचे स्वरूप हे जास्त प्रमाणात व तिव्र स्वरुपाचे असते.

त्यामुळे प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्हयातील मृत निवृत्तीवेतन धारकाच्या कुटुंबाच्या समस्येचा अभ्यास करण्याचे ठरविले आहे.

४.संशोधनाची उदिष्टये :

प्रस्तुत संशोधनात विषयाच्या अनुषंगाने पुढील उदिष्टये निश्चित करण्यात आलेली आहेत.

१.निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यु पश्चात त्यांच्या कुटुंबास येणा-या सामाजीक व आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

२.राज्यशासकीय निवृत्तीवेतन प्रणालीचा अभ्यास करणे.

३. कुटुंब निवृत्तीवेतनधारकास येणा-या प्रशासकीय समस्यांचा आढावा घेणे.

४.निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यु पश्चात त्याच्या कुटुंबाच्या जीवनशैली मध्ये होणा-या बदलांचे अध्ययन करणे.

५.कुटुंब निवृत्तीवेतन प्रक्रियेमध्ये व्यावसायीक समाजकार्य मध्यस्थीचा अभ्यास करणे.

५.संशोधनाची गृहितके :

१.निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यु पश्चात त्यांच्या कुटुंबीयास विविध समस्यांना सामोरे जावे लागते.

२.राज्यशासकीय निवृत्तीवेतन प्रणाली वेळखाऊ असल्यामुळे कुटुंब निवृत्तीवेतन मिळण्यास प्रतिक्षा करावी लागते.

३. कुटुंब निवृत्तीवेतनधारकास प्रशासकीय यंत्रणे विषयी माहिती नसल्यामुळे त्यास प्रशासकीय समस्यांचा उद्‌भवतात.

४.निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यु पश्चात त्याच्या कुटुंबाच्या जीवनशैली मध्ये नकारात्मक बदल दिसुन येतात.

५.कुटुंब निवृत्तीवेतन प्रक्रियेमध्ये व्यावसायीक समाजकार्य करण्यास वाव आहे.

६.अभ्यास विषयाचे क्षेत्र :

कुटुंब निवृत्तीवेतनधारकास आपल्या परिवाराच्या उदरनिर्वाहाकरीता अनेक समस्यांना तोंड दयावे लागते तसेच त्यास सामाजीक व आर्थिक असुरक्षितता भासत असते.अशा प्रकारे त्यांना येणा-या अडचणीचा अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्हयाची निवड केली असुन नांदेड जिल्हया मध्ये निवृत्तीवेतन तथा कुटुंबनिवृत्तीवेतन प्रदान करण्यासाठी ११ बॅकाच्या ६२ शाखे संपुर्ण जिल्हयाभरात विखुरलेल्या असुन त्यापैकी नांदेड शहरात २४ शाखे मार्फत कामकाज चालते तसेच निवृत्तीवेतन व कुटुंबनिवृत्तीवेतन धारकांची संख्याही शहरात जास्त असल्यामुळे संशोधनाच्या अध्ययनासाठी नांदेड शहराची निवड करण्यात आलेली आहे.

७.संशोधन पध्दती/आराखडा :

संशोधनाच्या उद्देशाची प्राप्ती आणि संशोधनला सुयोग्य दिशा देण्यासाठी या संबंधित आराखडा तयार केला जातो.संशोधन समस्येचा विचारपूर्वक अंदाज घेवुन त्या समस्येच्या आराखडयाचे स्वरूप निश्चित करावे लागते.प्रत्येक संशोधन आराखडयाचे विशेष महत्व आहे.प्रस्तुत संशोधनाचा उद्देश राज्यशासकीय निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यु पश्चात त्याच्या कुटुंबास येणा-या सामाजीक व आर्थिक समस्यांचा अभ्यास -विशेष संदर्भ नांदेड जिल्हा असल्याने वर्णनात्मक संशोधन आराखडा अवलंब करण्यात आला आहे.त्या आधारे संशोधनाची दिशा ठरवुन तथ्य संकलनसाठी बहुतांशी व अंशत:संख्यात्मकदृष्टया अध्ययन केले जावुन त्या आधारे मिळविलेल्या माहितीचे वर्गीकरण करूण निष्कर्ष काढले जातील.

८.नमुना निवड :

संशोधनत नमुना जर प्रातिनिधीक व योग्य असेल तर निष्कर्ष देखील सुयोग्य राहतात.म्हणुन संशोधनाची यशस्वीता व सार्थकते करीता प्रातिनिधीक नमुन्याची आवश्यकता असते.म्हणुन प्रस्तुत संशोधन विषयामध्ये संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील साधा यादृच्छिक नमुना निवड या पध्दतीचा वापर करून तथ्य संकलन केले जाईल त्यासाठी संशोधन क्षेत्रातील एकुण ३०० एककांची सदरील संशोधनासाठी नमुना म्हणुन निवड करण्यात येईल.

९.तथ्य संकलन:

सामाजिक संशोधनात तथ्ये,स्त्रोत महत्वाची असतात तथ्य व साधनांच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात.त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयाच्या संशोधनासाठी २ प्रकारच्या स्त्रोत साधनांचा उपयोग करण्यात आला.त्यात प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत यांचा समावेश होतो.

अ.प्राथमिक स्त्रोत:

या मध्ये प्राथमिक स्त्रोत म्हणून मुलाखत-अनुसुची तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.संशोधनाचे उद्देश व गृहितके समोर ठेवुन मुलाखत अनुसूची बनविली जाईल.तसेच या संशोधनासाठी निरिक्षण तंत्र हे वस्तुनिष्ठ माहिती मिळविण्यासाठी उपायोगात आणले जाईल.

ब.व्दितीयक तथ्य:

या विषयाशी संबंधीत संशोधनपरलेख, संदर्भ, ग्रंथ,मासिके,पुस्तक, साप्ताहिक, दैनिक,

विशेषांक,शासन अहवाल,शोधपत्रिका,विविध संबंधीत संकेतस्थळे इत्यादीचा आधार घेतला जाईल.

१०.तथ्यांचे वर्गीकरण:

संशोधनासाठी संशोधक जी तथ्ये संकलीत करतो ती अस्पष्ट, विस्तृत व अस्ताव्यस्त स्वरूपात असतात अशा विस्तृत व विखुरलेल्या तथ्यांच्या आधारे विश्लेषण करणे कठीण कार्य असते. तथ्यांचे निर्वचन सुलभतेने होण्यासाठी समजण्यायोग्य सारख्य आधारावर तथ्यांचे गट पाडण्या वर्गीकरण किंवा श्रेणीकरण असे म्हणतात. तथ्यांचे विश्लेषण करणे सुलभ व्हावे यासाठी अशा तथ्यांमधील समान किंवा असमान बाबी कोणत्या आहेत हे संशोकाला निश्चित करावे लागते. म्हणजेच तथ्यांचे निश्चित प्रकार किंवा वर्ग पाडण्यासाठी काही आधार निवडाव लागतात.त्यामुळे विखुरलेली तथ्य एका निश्चित स्वरुपाच्या प्रकारात किंवा वर्गात स्पष्ट होवू लागतात. प्रस्तुत संशोधनात तथ्यांचे वर्गी रणाच्या योग्य प्रकाराचा उपयोग केला जाईल.

११.तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन:

तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन केल्या शिवाय अध्ययनातुन निष्कर्ष काढणे शक्य होणार नाही. विश्लेषणाची परिणिती जर सामान्य स्वरूपाच्या निष्कर्षाच्या मांडणीत होत असेल तर संशोधन कर्त्यास हे जाणून घ्यावयाचे असते की, त्यांनी काढलेल्या निष्कर्षाचा वास्तविक अर्थ काय होतो अथवा या निष्कर्षामधून काय प्रतिबिंबीत होते. निर्वचन हेच जाणुन घेण्याचा एक मार्ग असल्याने ख-या अर्थाने निर्वचाखेरीज विश्लेषणाच्या कार्याची सांगता होत नाही. या मध्ये प्रामुख्याने केंद्रीय प्रवृत्तीची मापके,सरासरी,टक्केवारी,सहसंबंध या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.विश्लेषणाबरोबरच निर्वचनाचाही अवलंब करयात आला आहे.

१२.निष्कर्ष व निष्कर्षाचे निर्वचन:

संशोधनातील निष्कर्ष व निर्वचन ही शेवटी येणारी पायरी आहे.संशोधनाच्या माध्यमातून जे काही तथ्य प्राप्त होतात.त्यांचे विश्लेषण व निर्वचन झाल्यानंतर संक्षिप्त स्वरूपात जे तथ्य बाहेर येतात.त्यास निष्कर्ष असे म्हणतात.प्राप्त झालेल्या निष्कर्षांचे विवेचन किंवा प्रस्तुतीकरण करण्याचे काम संशोधकाला करावे लागते.निष्कर्षाचे निर्वचन झाल्यानंतर संशोधक गृहितकृत्याची पडताळणी करतो तेव्हा कोणते गृहितकृत्य सत्य व असत्य ठरली आहेत याची शहानिशा संशोधक करतो प्रस्तुत संशोधनात गृहीतकृत्याचा पडताळा घेतला आहे.

१३.संशोधन कालावधी :

सदरील कालावधीमध्ये सन २०१३ ते २०१७ या कालावधीतील आकडेवारीचे अध्ययन करण्यात येणार आहे.

१४.संशोधन मर्यादा :

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी महाराष्ट्रशासना कड ुन प्रदान केले जाणारे राज्यशासकीय कुटुंब निवृत्तीवेतनधारक निवडले आहेत व या संशोधनात कुटुंब निवृत्तीवेतनधारकाच्या सामाजीक व आर्थिक स्थितीचा,सामाजीक व आर्थिक समस्यांचा अभ्यास करावयाचा आहे.या संशोधनासाठी नांदेड जिल्हा हे कार्यक्षेत्र निवडले आहे.वेगवेगळया कार्यालयाकडुन मिळणारी माहिती,आकडेवारीच्या उपलब्धतेवर आणि नमुना म्हणुन निवडलेल्या उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीच्या सत्यतेवर या संशोधनातील विश्लेषण अवलंबुन आहे.

१५.संशोधन प्रकरण योजना :

प्रकरण १. प्रस्तावना.

प्रकरण २. संशोधन पद्धती व साहित्याचा आढावा.

प्रकरण ३. नांदेड जिल्हा : सामाजिक व भौगोलीक पार्श्वभुमी.

प्रकरण ४. कुटुंब निवृत्तीवेतनधारकाची सामाजीक स्थिती व समस्या.

प्रकरण ५. कुटुंब निवृत्तीवेतनधारकाची आर्थिक स्थिती व समस्या.

प्रकरण ६. तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन.

प्रकरण ७. शिफारशी व उपाययोजना.

प्रकरण ८. परिशिष्टे : अ.मुलाखत अनुसुची , ब.संदर्भ ग्रंथसुची.

१६.संदर्भ सुची :

१.pendionersportal.gov.in

२.pension/mahakosh.in

३.nanded.nic.in

४.महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२.

५.ज्येष्ठ नागरिक कायदा - डॉ.कुलकर्णी डी.एस,मनोरमा प्रकाशन मुंबई.

६.शास्त्रीय संशोधन पध्दती - डॉ.बी.एम.क-हाडे.पिंपळापुरे प्रकाशन नागपुर.

७.भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या - डॉ.मनवर डि.एस,अरूणा प्रकाशन लातुर.

८.पुणे शहरातील ज्येष्ठ नागरीक संघाचा एक समाजशास्त्रीय अभ्यास - विलास कि मगर २०१२,टिळक महाराष्ट्र विदयापीठ पुणे.

९.Distric Census Handbook Nanded,Maharashtra census of India २०११.

१०.स्वागत करूया उतारवयाचे - जाजू सविता,विदयाभारती प्रकाशण,लातुर.

११.वृध्दाश्रम - काळाची गरज - संत दि.म, ग्रंथाली ज्ञानयज्ञ प्रकाशन मुंबई.

संशोधक

वामन रामराव काकडे
M.Com(SET),MSW(SET,NET)
उपकोषागार अधिकारी,पेठ उमरी,नांदेड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.ए.पी.वलेकर,
सहयोगी अधिव्याख्याता व संशोधन मार्गदर्शक,
जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविदयालय,नांदेड